SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY,
"DNYANTEERTH", VISHNUPURI, NANDED-431 606
NAAC Re-accredited with 'A' Grade
Website : www.srtmun.ac.in
E-mail ID : affi.srtmun@gmail.com

# :: जाहिर प्रगटन ::

महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम १९९४ कलम ८६ मधील तरतुदीनुसार संलग्नीत महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था/ संशोधन संस्था यांमध्ये शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पर्यंत अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाचे नुतनीकरण, कायम संलग्निकरण/नैसर्गिकवाढ मिळण्याबाबतचे प्रस्ताव दिनांक ३१ ऑक्टोबर २०१५ पर्यंत विद्यापीठातर्फे स्विकारले जाणार आहेत असे यापूर्वी प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्र.शैक्षणिक/संलग्न-०३/२०१५-१६/१४६९, दि.१३.१०.२०१५ नुसार कळविण्यात आलेले आहे.

मा. उपसचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.उशिप २०१५/ प्र.क्र.६२६/विशि-३, दि. १७.१०.२०१५ व शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/उशिप/२०१५/नांवि/विशि-१,दि.१७.१०.२०१५ अन्वये प्रचलित विद्यापीठ कायद्यानुसार सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालये/अभ्यासक्रम/तुकडी देण्याबाबतचे प्रस्ताव दि. ३१.१०.२०१५ पर्यंत सादर करण्या संदर्भातील जाहिरात देणे, प्रस्ताव घेणे याविषयी कार्यवाही सध्या करु नये याबाबत नवीन निकषानूसार कार्यवाही करण्याची असल्याने पुढील सूचना देण्यात येतील, असे निर्देश प्राप्त झाले आहेत. तरी, संलग्नित महाविद्यालये/संशोधन संस्था यांनी सदर निर्देशाची नोंद घेवून नवीन महाविद्यालये/अभ्यासक्रम/तुकडी देण्याबाबतचे प्रस्ताव पुढील शासन निर्देश प्राप्त होईपर्यंत विद्यापीठास सादर करु नयेत.

तसेच संलग्नित महाविद्यालये/संशोधन संस्था यांनी केवळ अस्त्विात असलेल्या अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाचे नुतनीकरण, कायम संलग्नीकरण, नैसर्गिक वाढ मिळण्याबाबतचे प्रस्ताव दि. ३१.१०.२०१५ पर्यंत विद्यापीठास सादर करावे.

दिनांक :- १९.१०.२०१५
जावक क्र. शैक्षणिक/संलग्न-०३/२०१५-१६/1521

कुलसचिव